जिल्हा परिषाद /पंचायत समितीच्या ताब्यातो
खुल्या जागा /इमारती याचे अतिक्रमणापासून
रक्षण करणे.

महाराष्ट्र शासन

परिपत्रक क्र. जीपज १०८९/सीआर ३९५६/२६
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक - २५ जानेवारी १९९०

परिपत्रक -

जिल्हा परिषाद व पंचायत समितीकडे पुढील दोन प्रकारे खुल्या जमिनी व इमारती ताब्यातअसतात :-

१]जिल्हा परिषाद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १०० अन्वये हस्तांतरित योजनांबरोबरच योजनांची कार्यवाही करण्यासाठी हस्तांतरित झालेल्या इमारती व खुल्या जागा.

२]भूतपूर्व जिल्हा लोकल बोर्ड यांच्याकडून जिल्हा परिषादेकडे हस्तांतरित झालेल्या इमारती व खुल्या जागा.

यापैकी भूतपूर्व जिल्हा लोकल बोर्डाकडून जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित झालेल्या इमारती/खुल्या जागा यांची मालकी संपूर्णपणे जिल्हा परिषादांची असते व कलम १२८प्रमाणे जिल्हा परिषादा त्यांची विल्हेवाड लावण्यास सक्षम असल्या तरी सदर हस्तांतरणास शासनाची पूर्व परवानगी आवश्यक आहे. अधिनियमाच्या कलम १०० खाली हस्तांतरित झालेल्या योजनांतर्गतच्या जागा या एक तर भूसंपादन अधिनियमानुसार संपादीत केलेल्या असतात किंवा महाराष्ट्र जमिन महसूल संहितेनुसार शासकीय खुल्या जागा योजनांच्या कार्यवाहीसाठी हस्तांतरित केलेल्या असतात. त्यामुळे या जागा /इमारतींची मालकी त्या त्या संबंधित शासकीय विभागाची रहाते. अशा जागांची विल्हेवाट शासनाच्या परवानगी शिवाय लावता येत नाही.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
10 FEB 1990
महसूल
नि. उ. जि. जिल्हाधिकारी

२. याबाबत शासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, विविध योजनांसाठी हस्तांतरित झालेल्या अशा शासकीय इमारती/जागा किंवा भूतपूर्व लोकल बोर्डाकडून हस्तांतरित झालेल्या जिल्हा परिषादेच्या इमारती/खुल्या जागा यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत आहे. हे अतिक्रमण दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषादा त्वरित काळजी घेत नाहीत किंवा सदर अतिक्रमणाची बाबजिल्हा परिषादेच्या खुप उशिरा लक्षात येते. त्यामुळे सदर अतिक्रमणे कालांतराने दूर करणे कठीण जाते. विशेषत: जिल्हा व तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नागरी विभागातील व रस्त्यांच्या बाजूस असलेल्या जिल्हा परिषादेच्या/पंचायत समितीच्या इमारती/मोकळ्या जागेवर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात होत असते. जिल्हा परिषाद अधिनियमाच्या कलम २०० अन्वये जिल्हा परिषादेस अशी अतिक्रमणे दूर करण्याचे अधिकार आहेत व त्यासाठी आवश्यकतेनुसार महसूल व पोलीस यंत्रणेची सुध्दा मदत घेता येईल. परंतु ब-याच ठिकाणी अशा अतिक्रमणाची दखल घेतली जात नाही. पर्यायाने नागरी विभागातील जिल्हा परिषादेच्या ताब्यात असलेल्या जागांमध्ये हळूहळू घट होवून भविष्य काळात जिल्हा परिषादांना विस्तार व विकास कामासाठी जागांची अडचण भासणार आहे. यास्तव या परिपत्रकान्वये शासन पुढील प्रमाणे सूचना देत आहे.

१]सर्व जिल्हा परिषादा/पंचायती समितीनी त्यांच्याकडे असलेल्या इमारत

व त्या सभोवतालची मोकळी जागा तसेच इमारती विना असलेल्या खुल्या जागा यांची स्वतंत्र यादी त्वरित तयार करावी. या शिवाय मालमत्ता नोंद विहित अशा जमिनीची नोंद असावीच.

२] उपरोक्त यादीप्रमाणे असलेल्या सर्व जमिनीस आवश्यकतेप्रमाणे कुंपण घालावे व सदर जागांवर जागा संबंधित जिल्हा परिषद पंचायत समितीची मालकीची असल्याबाबत व कोणत्या विशिष्ट प्रयोजनासाठी ती राखीव आहे त्या बाबतचा स्पष्ट फलक लावावा.

३] उपरोक्त नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेच्या नोंदवह्या अद्यावत कराव्यात व त्याबाबतचे प्रत्येक मालमत्तेसंबंधातील महसूल विभागाकडील व अन्य कागदपत्र यांची पडताळणी करुन ती व्यवस्थित आहेत याची खात्री करावी.

४] अशाप्रकारे जिल्हा परिषदेच्या ताब्यातील इमारती खुल्या जागांवर काही अतिक्रमणे झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत कायद्याने कलम २०० नुसार योग्य ती कारवाई त्वरित पूर्ण करावी व अतिक्रमण दूर करण्यात यावे. यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस व महसूल यंत्रणेची मदत घ्यावी.

५] ग्राम पंचायतीकडील इमारती व खुल्या जागा याबाबत प्रत्येक ग्राम पंचायत उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करेल हे संबंधित पंचायत समित्यांनी पहावे. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५३ नुसार ग्राम पंचायतीस असे अतिक्रमण दूर करण्याचे अधिकार आहेत. अशा प्रकारे कार्यवाही केलीच न झाल्यास त्याबाबत संबंधित ग्राम सेवक व पंचायत समिती स्तरावरील अधिकारी /कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

६] जिल्हा परिषद स्तरावर याबाबतच्या कामाचे सनियंत्रण कार्यकारी अभियंता [बांधकाम] यांचेकडे देण्यात यावे.

उपरोक्त सूचनांचे सर्व जिल्हा परिषदा / पंचायत समिती यांनी काटेकोरपणे पालन करावे.

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी
10 FEB 1980
शाखा -

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

३.२.८०

[ ना. धों. सर्वे]

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्र. लि. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद [सर्व]

विभागीय आयुक्त [सर्व]